# भंडारा पोलीस



# E-Darbar

## समस्या, प्रश्न निवारण पद्धती

ई – दरबार ऑनलाईन तक्रार सिस्टमद्वारे अधिकारी/ अंमलदार यांचे एकाच वेळी त्यांच्या समस्यांचे व अडचणीचे ऑनलाइन पध्दतीने निराकरण करणे होय.



# E-Darbar



## संकल्पना

महिन्याच्या शेवटच्या आठवडयात पोलीस अधीक्षक यांचे कक्षात पोलीस अधीक्षक, मंत्रालयीन कार्यालय अधीक्षक व लिपीक वर्ग बसून पोलीस अधीक्षक कार्यालयाद्वारे तयार करण्यात आलेल्या ई-दरबार ऑनलाईन तक्रार सिस्टमद्वारे ऑनलाईन पध्दतीने सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व ठाणे प्रभारी अधिकारी, दुय्यम अधिकारी, सर्व शाखेतील अधिकारी व अंमलदार यांचेशी ऑनलाईन पध्दतीने जुळतात, प्रत्येक पोलीस स्टेशनचे अधिकारी /अंमलदार एकाच वेळी ऑनलाईन हजर राहुन आपल्या समस्या सांगतात अधिकारी /अंमलदार यांच्या समस्यांबाबत पोलीस अधीक्षक हे संबंधीत लिपीकाला वेळीच विचारणा करतात व त्यांच्या तक्रारींची नोंद घेण्याबाबत सांगतात व त्यांच्या तक्रारींचे तात्काळ निरसन करण्यात येते. तसेच केलेल्या कार्यवाहीचे इतिवृत्त तयार करुन सर्व ठाणे प्रभारी अधिकारी, दुय्यम अधिकारी, सर्व शाखेतील अधिकारी व अंमलदार यांना त्यांचे तक्रारीचे निराकरण केल्याबाबत अवगत करण्यात येते. पोलीस अधिकारी /अंमलदार समाधान कक्षामध्ये तक्रार नोंदवू शकतात व त्यांच्या तक्रारीचा विहीत मुदतीचे आत निपटारा करण्यात येते व त्यांचे तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीबाबत त्यांना माहिती देण्यात येते.

# छायाचित्र










# छायाचित्र





# व्हीडीओ



## यापूर्वी अंमलात असलेल्या पद्धतीमुळे येत असलेल्या अडचणी



- ❖ यापूर्वी जिल्ह्यातील पोलीस अधिकारी / अंमलदार हे त्यांच्या तक्रारी व अडचणी टपालद्वारे पाठवित असत.
- ❖ पोलीस अधीक्षक साहेब यांचे समक्ष तक्रारी मांडता येत नव्हत्या. त्यामुळे त्यांचे समस्येचे निराकरण होत नव्हते.
- ❖ एकाच वेळी जिल्ह्यातील सर्व पोलीस अधिकारी / अंमलदार उपस्थित राहणे शक्य नव्हते.
- ❖ पोलीस अधिकारी / अंमलदार यांच्या तक्रारी निकाली काढण्याकरिता बराच विलंब होत होता.
- ❖ पोलीस अधिकारी / अंमलदार यांना कार्यालयीन कामाकरिता वारंवार वेळ काढून कार्यालयात ये-जा करावे लागत होते. तसेच त्याकरिता नाहक त्रास सहन करावा लागत होता.
- ❖ पोलीस अधिकारी / अंमलदार हे सुट्टीवर असल्यास त्यांना दरबारचे नियोजीत वेळी हजर राहणे शक्य होत नव्हते.
- ❖ **ई-दरबार** मुळे वरील अडचणी दूर करण्यात यश प्राप्त झाले आहे.

# ई-दरबार - अभिनव प्रयोग



- **ई-दरबार हा अभिनव प्रयोग** भंडारा जिल्ह्यातील पोलीस दलाकरीता पहिल्यांदाच आयोजित करून राबविला जात आहे.
- सदर ई-दरबार मध्ये जिल्ह्यातील पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी आतुरतेने भाग घेतला,
- आपल्या शंका व तक्रारी तसेच वरिष्ठ अधिकारी किंवा मंत्रालयीन कर्मचारी यांचेकडून पोलीसांच्या वैयक्तीक कामात होणाऱ्या कार्यालयीन दिरंगाई बाबत माहिती थेट पोलीस अधीक्षक यांना देण्यात येते.
- प्रामुख्याने मेडीकल बिल, पोलीस वसाहत मधील असुविधा, रखडलेली पदोन्नती, रखडलेली वेतनवाढ, कुटुंबियांच्या अडचणी असे अनेक मुद्दे निर्भिडपणे पोलीस अधीक्षक यांचे समक्ष मांडले जातात.
- पोलीस अधीक्षक यांनी पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या तक्रारींचे वेळेवरच संबंधित मंत्रालयीन कर्मचारी व पोलीस अधिकारी यांना सुचना देवुन निरसन केले व उर्वरीत तक्रारींबाबत वरिष्ठस्तरावर शिघ्रतेने पाठपुरावा करून त्यांचे सर्व प्रश्न लवकरात लवकर निकाली काढण्यात येते आहे.
- **ई-दरबार या अभिनव** प्रयोगाबाबत जिल्ह्यातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी आनंद व्यक्त केला आहे.

# थेट संवाद व उपस्थिती

मा. पोलीस अधीक्षक
साहेब यांची थेट चर्चा





मा. पोलीस अधीक्षक साहेब यांचेशी
थेट संवाद व एकाच वेळी उपस्थिती

# ई-दरबार करिता साधनसामुग्री







- जिल्हा नियोजन समिती व विकास समितीचे निधीतून ई – दरबारकरिता आधारभूत सुविधा पुरविण्यात आलेल्या आहे जसे –

- संगणक संच
- वेब कॅमेरा
- साऊंड सिस्टम
- माईक
- इंटरनेट (इंटरनेट डोंगल )





# ई-दरबारचे फायदे



- पोलीस अधीक्षक स्वत: जिल्ह्यातील कुठल्याही पोलीस अधिकारी / अंमलदार यांचे तक्रारींची दखल घेऊ शकतात.
- पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे तक्रारींचे निरसन करण्याकरिता विलंब टाळता येणे शक्य झाले आहे.
- पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे अमूल्य वेळेची बचत करणे शक्य झाले आहे.
- प्रलंबित तक्रारींची संख्या जलदगतीने कमी होत असून जलदगतीने तक्रारी व अडचणींचे निरसन व पूर्तता होत आहे.
- पोलीस अधीक्षक कार्यालयातील कामकाजात सर्व पातळीवर पारदर्शकता वाढली असून सर्व कामांना गती प्राप्त झाली आहे.
- पोलीस अधिकारी/अंमलदार यांचा आपले वरीष्ठांप्रती आदर व विश्वास वाढतो.

# प्रसार माध्यमांनी घेतलेली दखल



## ई-दरबारच्या माध्यमातून पोलीस कर्मचाऱ्यांच्या समस्या ऐकून तातडीने निराकरण

### पोलीस अधीक्षक नुरुल हसन यांचा पुढाकार

दै. लोकजन वृत्तसेवा

भंडारा :- आज दि. ५ जून ०२५ रोजी सकाळी ११ ते २ दरम्यान भंडारा जिल्ह्यातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या सेवा व वैयक्तिक समस्यांचे तातडीने निराकरण करण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक नुरुल हसन सर यांच्या अध्यक्षतेखाली ई-दरबार चे आयोजन करण्यात आले. या ई-दरबारामध्ये जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांतील अधिकारी आणि कर्मचारी यांनी ऑनलाईन व प्रत्यक्षरित्या सहभाग घेतला. त्यांनी आपापल्या समस्या, अडचणी, आणि सेवा विषयक मुद्दे मांडले. पोलीस अधीक्षक यांनी प्रत्येक समस्येची गांभीर्याने दखल घेतली व संबंधित विभागांना त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. कार्यक्रमादरम्यान कर्मचाऱ्यांच्या निवासी सुविधा, आरोग्य सुविधा,



स्थानांतर, प्रमोशन, प्रशिक्षण, कार्यालयीन अडीअडचणी, आणि अन्य सेवा विषयक बाबींवर चर्चा झाली. अनेक समस्यांवर तातडीने निर्णय घेऊन त्याचे समाधान करण्यात आले. या उपक्रमामुळे पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली असून, त्यांनी ई-दरबाराबद्दल सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या आहेत.

- पोलीस अधीक्षक यांनी सांगितले की, पोलीस दलाच्या कार्यक्षमतेत वाढ व्हावी यासाठी कर्मचाऱ्यांचे मनोबल उंचावणे गरजेचे आहे. त्यासाठीच त्यांचे प्रश्न ऐकणे आणि सोडवणे ही आमची जबाबदारी आहे. भविष्यातही असे उपक्रम नियमितपणे राबविण्यात येतील, असे ही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

---

मस्ट READ

## एसपींनी साकारली 'ई-दरबार'ची संकल्पना !

### अनोख्या कार्यपद्धतीने पोलिस कर्मचारीही सुखावले

लोकमत न्यूज नेटवर्क

भंडारा : एरवी पोलिस खात्यामध्ये कर्मचाऱ्यांच्या समस्या तशाच खितपत पडून असतात. कर्मचारी त्या मांडायला धजावत नाहीत. शिस्तीच्या नावाखाली कुणी सांगायलाही पुढे येत नाही. मात्र या परिस्थितीवर मात करीत भंडाऱ्याचे जिल्हा पोलिस अधीक्षक नूरूल हसन यांनी तंत्रज्ञानाची साथ घेत 'ई-दरबार' ही अनोखी संकल्पना साकारली. एकाच वेळी सर्व १७ पोलिस स्टेशनमधील कर्मचाऱ्यांच्या तक्रारी आणि समस्या ऐकून घेतल्या अन् त्यावर लगेच निर्णयही घेतला. ई-दरबारच्या माध्यमातून पोलिस कर्मचाऱ्यांच्या समस्या ऐकून तातडीने निराकरण होण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. यामुळे अनेक कर्मचाऱ्यांनी या निर्णयाचे स्वागत करीत आनंदही व्यक्त केला.

५ जूनला सकाळी ११ ते २ वाजेच्या दरम्यान तीन तास हा उपक्रम चालला. जिल्ह्यातील सर्व ठाण्यांमध्ये काम करणारे पोलिस अधिकारी व अंमलदार यांच्या सेवा व वैयक्तिक समस्यांचे तातडीने निराकरण करण्याच्या उद्देशाने त्यांनी हे आयोजन केले होते. या ई-दरबारामध्ये जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी ऑनलाईन व प्रत्यक्षरित्या सहभाग घेतला. त्यांनी आपापल्या समस्या, अडचणी आणि सेवाविषयक मुद्दे मांडले.

**१७**
पोलिस ठाणे हद्दीतील कर्मचाऱ्यांच्या समस्या ऐकूण घेतल्या.



इ दरबारात पोलिस कर्मचाऱ्यांच्या समस्या ऐकून घेताना पोलिस अधीक्षक नुरूल हसन.

**पोलिस अधीक्षक यांनी प्रत्येक समस्येची गांभीर्याने दखल घेतली व संबंधित विभागांना त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. या दरम्यान कर्मचाऱ्यांच्या निवासी सुविधा, आरोग्य सुविधा, स्थानांतर, प्रमोशन, प्रशिक्षण, कार्यालयीन अडीअडचणी आणि अन्य सेवाविषयक बाबींवरही चर्चा झाली. अनेक समस्यांवर तातडीने निर्णय घेऊन त्यांचे समाधान करण्यात आले. या उपक्रमामुळे पोलिस कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली असून, त्यांनी सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या आहेत.**


### काय आहे ई-दरबार ?


या उपक्रमांतर्गत प्रत्येक पोलिस स्टेशनमधून संबंधित पोलिसांनी ऑनलाईन येत आपल्या समस्या, अडचणी मांडल्या. भंडारा येथील पोलिस विभागाच्या मिटिंग हॉलमध्ये जिल्ह्याच्या पोलिस खात्यामधील सर्व वरिष्ठ अधिकारी, वेल्फेअरचे अधिकारी उपस्थित होते. उपस्थित सर्व अधिकाऱ्यांसह एसपींनी समस्या ऐकून घेत संबंधित अधिकाऱ्यांचे मत घेतले. तातडीने त्याचे निराकरणही केले.

**पोलिस दलाच्या कार्यक्षमतेत वाढ व्हावी, यासाठी कर्मचाऱ्यांचे मनोबल उंचावणे गरजेचे आहे. त्यासाठीच त्यांचे प्रश्न ऐकणे आणि सोडवणे, ही आमची जबाबदारी आहे. या उपक्रमातून अनेक दिवसांचे प्रश्न सोडविता आले आणि वेळेचीही बचत झाली. भविष्यातही असे उपक्रम नियमितपणे राबविण्यात येतील.**

**नूरूल हसन**, जिल्हा पोलिस अधीक्षक

# E – Darbar ऑनलाईन तक्रार






## ❖ ई दरबार या संकल्पनेला FICCI यांचे कडुन स्मार्ट पोलिसींग चा राष्ट्रीय पुरस्कार मिळालेला आहे.

**SUMEET GUPTA**
Deputy Secretary General

February 17, 2025

**Smt. Rashmi Shukla, IPS**
**Director General of Police**
**Maharashtra State Police**
**Chhatrapati Shivaji Maharaj Marg,**
**Colaba, Mumbai - 400001**

**Federation of Indian Chambers of Commerce and Industry**
Federation House
Tansen Marg
New Delhi 110001
T +91 11 23738760 (11 lines)
F +91 11 23320714 / 23721504
E ficci@ficci.com
www.ficci.in
CIN: U99999DL1956NPL002635
**ISO 9001:2015 Certified**

**Letter No. HLS/03/2024/230**
**(CONFIDENTIAL)**

Dear Smt. Shukla,

**FICCI SMART Policing Awards**
**March 04, 2025 | FICCI, Federation House, Tansen Marg, New Delhi**

Greetings from FICCI!

This has reference to my Letter No. Letter No. HLS/03/2024/230 dated March 06, 2024, inviting entries from Maharashtra State Police for FICCI Award for Best Practices in SMART Policing 2023.

I am pleased to inform you that this year we have received over 129 entries from 23 organisations including 16 State Police Forces and 6 CAPFs & other Central Agencies. We thank Maharashtra State Police for submitting entries for the FICCI SMART Policing Awards.

**The Esteemed Jury** of FICCI SMART Policing Awards has **selected the following entries from your organisation.** Award Ceremony will take place during **FICCI Homeland Security 2025**, which will be organised on **March 04, 2025** at **FICCI, New Delhi**.

| Name of the Initiative | Category | Concerned Official |
|---|---|---|
| Project Udaan | Community Policing | Mr Neelot Pal, Superientendent of Police, Gadchiroli |
| E-darbar | Other Policing Initiative | Mr Noorul Hasan, the then SP, Wardha, and present SP, Bhandara |
| Women's , Child Safety & related Crime investigations | Human Trafficking | Ms Pramila Nikam, Head Constable, Rajgad PS, Pune |

In this regard,

- **Kindly nominate concerned officials** to receive the award by participating in the Award Ceremony and also other sessions of Homeland Security conference on March 04, 2025 at FICCI, Federation House, Tansen Marg, New Delhi. The official could send her confirmation in the enclosed Registration Form.
- We also request you to **join us for this programme as 'Special Invitee' and encourage the official of your department with your presence** as they receive prestigious FICCI SMART Policing Award.

**May I request you to advise your office to NOT to share this information with Media (and on social media) before the Award Ceremony (March 04, 2025).**

You may kindly advise your office to contact my colleague **Mr. Gaurav Gaur, Additional Director, FICCI (+91-9873 1 11 690 / gaurav.gaur@ficci.com)** for further information or details.

We look forward to your kind and favourable response.

With best regards & your sincerely,

**Sumeet Gupta**
Encl: a/a

Industry's Voice for Policy Change

FICCI
SMART POLICING
AWARDS

# ई-दरबार बाबत पोलीस अधिकारी अंमलदार यांचे अभिप्राय



- **ई-दरबार या अभिनव** प्रयोगाबाबत जिल्ह्यातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी आनंद व्यक्त करून पोलीस अधीक्षक साहेब यांचे आभार मानले आहे.
- लिपीक वर्ग - पोलीस अधिकारी/अंमलदार यांना त्यांची समस्या असल्याने अर्जाद्वारे सादर करतात. सदर अर्ज लिपिक वर्गाकडे पोहचण्यास बराच विलंब लागतो. त्यामुळे त्यांचे समस्यांचे निराकरण वेळीच करणे शक्य होत नाही. **ई-दरबाराचे** माध्यमातून घटकातील पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी व्यक्त केलेल्या समस्याबाबत वेळीच अवगत होऊन त्यांचे समस्यांचे निराकरण लवकरात लवकर होऊन त्यांचे समाधान होईल असा अभिप्राय व्यक्त केला आहे.

# ई-दरबार बाबत पोलीस अधिकारी अंमलदार यांचे अभिप्राय



- पोलीस अधिकारी - पोलीस अधिकारी यांनी त्यांच्या समस्याबाबत लिखित अर्ज टपालाद्वारे मा. पोलीस अधीक्षक, भंडारा यांचेकडे सादर केल्यानंतर सदर अर्ज टपालाद्वारे पोहचण्यास विलंब होतो. आम्हाला असलेल्या समस्यांचे निराकरण वेळीच होत नाही. ई-दरबार नियमित सुरु राहिल्यास आम्ही ई – दरबारात आमची समस्या समोरासमोर सांगू शकतो व मा. पोलीस अधीक्षक, भंडारा हे कार्यालय अधीक्षक, मंत्रालयीन लिपिक, पोलीस उपाधीक्षक गृह यांना निर्देशित करून नियमात असल्यास आमचे समस्यांचे वेळीच निराकरण होणेस मदत होते, असा अभिप्राय व्यक्त केला आहे.
- पोलीस अंमलदार - पोलीस अंमलदार यांनी आमच्या समस्यांबाबत लिखीत अर्ज ठाणेदार यांचे मार्फतीने मा. पोलीस अधीक्षक, भंडारा यांचेकडे सादर केल्यानंतर सदर अर्ज टपालाद्वारे पोहचण्यास विलंब होतो. त्यामुळे आम्हाला असलेल्या समस्यांचे निराकरण वेळीच होत नाही. **ई-दरबार** नियमित सुरु राहिल्यास आम्ही ई-दरबारात आमची समस्या समोर समोर सांगू शकतो व मा. पोलीस अधीक्षक, भंडारा हे कार्यालय अधीक्षक, मंत्रालयीन लिपिक, पोलीस उपाधीक्षक गृह यांना निर्देशित करून नियमात असल्यास आमचे समस्यांचे वेळीच निराकरण होणेस मदत होते, असा अभिप्राय व्यक्त केला आहे.



महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# भंडारा पोलीस